१९२८

श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

## मासिक पुस्तक.

वर्ष ६ वें ] [ अंक १–२

नलिनीदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम् ।



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका ॥
श्रीशंकराचार्य.

संपादकः— { लक्ष्मण गणेश महाजनी.
रामचंद्र आत्माराम तर्खड.

# अनुक्रमणिका


स्फुट-श्री० पांचलेगांवकर महाराज यांच्यासंबंधानें
दिलेली माहिती . ८०७-८१३
„ श्री साईनाथ कृपालहरीमधील वेंचे.
(रा. रा. नीळकंठ गडी काठीकर.) .. ... ८१३-८१८
„ पद्य—( श्री उद्धवेशबुवा ) . ८१८-८१९
„ „ —(रा शंकर वासुदेव सामंत, ठाणें) . . ८२०
„ शके १८५० च्या श्रीराम जयंतीच्या उत्सवाचा अहवाल ८२१-८२९
„ शके १८५० पासून ३ वर्षांकरितां नेमलेलें
श्रीसंस्थानकमिटीचें कार्यकारीमंडळ . . ८३०
„ शिरडी गांवची व्युत्पत्ति. ८३१-८३७
„ सिद्धपुरची यात्रा व त्या वेळचे महाराजांचे अनुभव. ८३७-८४९
„ सविनय प्रार्थना. . . ८४९-८५३
महाराजांचे अनुभव-श्रींची पालखी व
पालखीची खोली ( रा. र. भा. पुरदरे यांजकडून. ) ६५९-६६
„ ( बाबांचे बाळ याचेकडून. ) ६६५-६७
श्रीसाईसच्चरित—अध्याय ५१ वा ( श्री हेमाडपंत ) . ८५७-८८


## श्री साईभक्तांस विज्ञप्ति.

कोणाला श्री साईमहाराजांबद्दलचे त्यांचे स्वतःचे अनुभव श्री साई लीलेंत प्रसिद्ध व्हावे म्हणून पाठविण्याचे असतील त्यांनीं ते आमचेकडे पाठविल्यास-ते प्रसिद्ध होण्याबद्दल आदरपूर्वक योग्य तो विचार होईल.

रा. आ. तर्खड

—प्रकाशक

## वार्षिक वर्गणी.

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनिऑर्डरने अगाऊ रु. ३।=, व्ही. पी ने रु. ३॥, फुटकळ अंक ।= मागील अंकास शिल्लक असल्यास -॥-

८०६

कै० ह० भ० प० **बाळाराम कृष्णनाथ धुरंधर,** बी. ए., एल्एल्. बी.

ॲडव्होकेट, माजी प्रिन्सिपाल गव्हर्नमेंट लॉस्कूल मुंबई.



पहा श्री साईसच्चरित अध्याय ५१ वा.

यापूर्वी श्री साईलीलेचे एका अंकात श्री पाचलेगांवकर महाराज यांच्या संबंधाने आलेल्या माहितीशिवाय सदर्हू महाराज याचे वडील श्रीयुत राजारामपंत नरसिंह पाडे, कुळकर्णी देशपाडे पाचलेगाव तालुका आणि पोष्ट जिंतूर जिल्हा परभणी मु॥ इ० मोगलाई येथील वतनदार यांनीं रावबहादुर मोरेश्वर विश्वनाथ प्रधान यांस आपले चिरंजीव श्रीयुत पाचलेगावकर नरसिंह बाबामहाराज यांचे संबंधाने दिलेली माहिती.

महाराजांचे गोत्र कौशिक; महाराजांचा जन्म आश्विन वद्य १४ ( नरक १४ दशी ) पहाटे ३ वाजता शके १८३१ ( १ ) रवीवारीं झाला. त्यांच्या बाळपणाच्या लीला फार चमत्कारिक आहेत. एकदा असे झाले कीं, १२ दिवसाच्या आंत महाराज पाळण्यात असता पाळण्यातून उडी मारून खालीं भाकरीचे तुकडे खाऊं लागले.

( २ ) चार वर्षांच्या वयापासून त्यानीं लहान मुलांचे पुढारी व्हावें व दगडाचे देव दगडाचे टाळ वगैरे करून देवाची पूजाअर्चा करावी. त्यांचा व्रतबंध होईपर्यंत त्यांचा हाच क्रम. त्यास लहानपणीं शाळेमध्ये अभ्यासाकरिता घातले होते; पण अभ्यास करावयाच्या ऐवजीं या मुलानें मास्तरलाच मारुतीची अगर माधवाची मूर्त काढून दाखवावी. त्याचें वय ८ वर्षांचे असतांना सिंहस्थ पर्वणीला आम्हीं रत्नेश्वर रामपुरीस गेलो असता त्यांचा व्रतबंध झाला. महाराज त्या पूर्वीच प्रातःस्नान करीत असत. एकदा मानवत् रोडवर गेल्यावर सूर्योदय झाला. महाराज व आम्हीं बैलगाडीचा प्रवास करीत असता ऐन उन्हाळ्याच्या दिवसांत महाराज प्रातःस्नान करण्याकरिता गाडींतून उडी मारून माळरानांत शिरले. जवळपास पाणी नाहीं तेव्हा रेतींतच स्नान करून गाडींत चढले. त्या वेळीं त्यांचें खाद्य, म्हणजे दुर्वा व बेल. पुढे आम्हीं रामपुरी रत्नेश्वर येथें पोहोंचलों. तेथें पोहोंचल्यावर दुसरे दिवशीं स्वयंपाक वगैरे करविला, भोजनास बसावयाचें म्हणून महाराज कोठें आहेत त्याना शोधून आणण्याची तजवीज चालली असतां ते गंगेच्या पात्रात बारीक रेतींत मांडी घालून बसलेले आढळले. तो चैत्राचा महिना असून वेळ भर दोनप्रहरची होती.त्या वेळीं उन्हाळा

इतका कडक होता कीं, आम्हांस पायांत जोडे घालून झाडाच्या सावलीसही उभें राहावत नव्हते. त्यांच्याजवळ जाण्याची कोणालाही हिंमत होत नव्हती, मग आम्हीं झाडाखालून त्यांना हाका मारूं लागलों; परंतु महाराजांनीं कांहीं जबाब दिला नाहीं. रा० भाऊदेव पाथरकर हे आमच्याजवळ होते त्यांनीं आम्हांस विचारलें, " तुम्हीं कोणाला हांका मारितां आणि कशाकरितां " आम्हीं उत्तर दिले " हा आमचा मुलगा आहे. स्वयंपाक तयार होऊन जेवणारी मंडळी याच्याकरितां थांबून राहिली आहे. म्हणून याला हाका मारितों. " भाऊदेव म्हणाले " ही तुमची अगदीं चूक आहे कारण अगदीं कडकडीत उन्हाळ्यामध्ये ऐन दुपारच्या वेळीं अशा प्रखर रेतींत बिन वस्त्रानें परमेश्वराचे नामस्मरण करीत बसणारास तुम्हीं आपला मुलगा समजतां व त्याला भोजनाचा तगादा लाविता ही तुमची चूक आहे " इतकें झाल्यावर आम्हीं मुकाट्यानें परतलों व पात्रे वाढवून भोजनास बसणार इतक्यांत महाराज आले व पात्रावर बसून पाच घांस घेऊन पुनः उठून गेले.

त्या वेळीं रत्नेश्वर रामपुरीस एक स्वामी राहात असत. ते कोणाशींच कांहीं भाषण करीत नसत. मात्र महाराजाच्या व त्या स्वामींच्या फार गुह्य गोष्टी चालत. रामपुरीस दोन दिवस राहून आम्हीं पाचले गावीं परत आलों. परत आल्यावर आम्हीं महाराजांची श्मश्रु करविण्याचा प्रयत्न केला; पण त्यांनीं श्मश्रु करवूं दिली नाहीं. महाराजांनीं आपली सोडमुंजही करवूं दिली नाहीं. त्यांची सोडमुंज अजून झाली नाहीं. पांचलेगांवीं एक पुरातन हेमाडपंती महादेवाचे देवालय होतें; पण आंत लिंग वगैरे कांहीं नव्हते. सारांश देवालय पडीत राहिल्यामुळे गावांतील लोकांचें केरकचरा टाकण्याचे ठिकाण झाले होते. या ठिकाणीं वाटेल त्या वेळीं जाऊन तपश्चर्या करीत बसावयाचें असे हे महाराजांचे एक ठिकाण झालें होते. असा कांहीं काल गेल्यावर महाराज वऱ्हाड प्रातात एकटेच जाऊन श्रीक्षेत्र लोनी, मेकर, व लोणार, या ठिकाणीं महाराजांनीं कांहीं दिवस कालक्रमणा केली. लोणार मुक्कामीं कमलादेवीजवळ पापहरेश्वर नांवाचे तीर्थ आहे. त्या तीर्थामध्यें १४ दिवस व १४ रात्रीपर्यंत

राहून महाराजांनीं कोणास न कळतां योगसाधन केले. पुढें ही गोष्ट गावांतील लोकांस कळली, तेव्हां त्यांनीं त्यांना गांवांत नेण्याचा प्रयत्नही केला. माझ्या मर्जी-प्रमाणें वागाल तर मी गांवात येतों असें महाराजांनीं म्हटलें. मंडळीने ती गोष्ट कबुल केली. बाबाराव पांडे वगैरे गांवांतील अनेक मंडळींनीं त्याना गावांत नेऊन त्यांच्या त्रिकाल पुजेचा नियम चालविला. नेल्याचे दुसरे दिवशीं महाराजांच्या आज्ञेप्रमाणें गांवातील मंडळीला प्रयोजन करून पालखी व भजन वगैरेचा थाट केला. कांहीं दिवस महाराज लोणार मुक्कामीं राहिले. त्या वेळीं त्यांचे वय ९।९॥ वर्षांचे होतें. ही खबर पांचलेगावीं लागली, जवळ जवळ तीन महिने झाले, म्हणून आम्हालाही महाराजाची भेट व्हावी असे वाटलें. महाराज अल्पवयी असून त्यांच्यापाशीं त्यांच्या गावातल व वरचे कोणी मनुष्य नसल्यामुळें काळजी उत्पन्न झाली. त्याचा शोध करावा व ते कदाचित् श्री सखाराम महाराज साधु याची यात्रा कार्तिक वद्य ११पासून मार्गशीर्ष शु॥६ पर्यंत लोणी येथे भरते,तेथे महाराज येतील या आशेने आम्हीं तेथे गेलों; शोध केला पण महाराज आल्याची खबर लागली नाहीं दुसरे दिवशीं लोणारकर बाबासाहेब कुळकर्णी ह्यांनीं खबर दिली कीं ९।१० वर्षांच्या वयाचा मुलगा कंबरेस एक लंगोटी व मस्तकावर जटांचा भारा असे आमच्या गावीं आहेत, त्यांना विचारपूस करताच त्याच्या बोलण्याचा कांहींच मेळ लागत नाहीं म्हणून दुसरे दिवशीं मीं लोणार मुक्कामीं गेलों पाहातो तो बाबाराव पांडे यांच्या घरीं महाराज पूजा करीत बसले होते. त्या ठिकाणीं गावातील बरीच मंडळी बसली होती. त्या मंडळींनीं माझ्याकडे बोट करून महाराजास प्रश्न केला कीं, हे गृहस्थ आपल्या गावचे किंवा आपले कोणी आप्त आहेत काय? त्याना महाराजांनीं उत्तर दिले कीं, हा आमच्या गावचा एक ब्राह्मण आहे. नंतर मी महाराजाजवळ जाऊन सांगितले कीं, आपण गाव सोडून गेल्याला आज अजमासे तीन महिने झाले. तुमची आई वगैरे तुमच्या भेटीकरिता फार कष्टी असून रात्रंदिवस चिंता करीत असतात, म्हणून मी आप-णास नेण्याकरितां आलो आहे, हे ऐकून त्यांनीं माझा मान राखून दुसरे दिवशीं येण्याची तयारी केली व मजबरोबर पांचलेगावाला आले व दोनतीन महिने तेथे राहिले. नंतर पांचलेगांवाहून सात कोसांवर शेलू म्हणून एक गांव

आहे त्या ठिकाणीं एका यज्ञास आरंभ झाला व मेहेकर बाळाभाऊ या नावाचे एक मोठे अधिकारी साधु यांनीं शेलू येथील मंडळीस आज्ञा केली कीं ह्या यज्ञामध्ये मोठें विघ्न होणार आहे; तरी तुम्हीं पाचलेगांव येथे जाऊन श्रीनरसिंह बावामहाराज यास ह्या समारंभास घेऊन आल्यास यज्ञ निर्विघ्नपणें शेवटास जाईल. या आज्ञेप्रमाणें कांहीं मंडळी पांचलेगांवीं येऊन महाराजांस घेऊन गेले व यज्ञाचा समारंभ बऱ्याच थाटाचा होऊन यज्ञ पार पडला; पण पूर्णाहुतीच्या दिवशीं भाऊसाहेब या नावाचा एक श्रीमंत मारवाडी यज्ञकुंडाच्या ठिकाणीं थाटमाट पाहाण्यास आला असता, त्याला एकदम चक्कर येऊन जमिनीवर अचेतन पडला. वाचा बंद झाली. मारवाड्याच्या आईबापास फार दुःख होऊन ते रडूं लागले असता, महाराजांनीं त्याची समजूत करून त्या मारवाड्यास सावध केले. वाचा तर कांहीं दिवस बंदच राहिली. महाराजांनीं त्याला आज्ञा केली कीं, पांचलेगावीं येऊन दर सोमवारीं श्रीमुक्तेश्वराचें दर्शन घेत जा. मारवाड्याने त्याप्रमाणे केले व ८।१५ दिवसानीं त्याला वाचा आली व तो बोलूं लागला. हे वर्तमान जिकडे तिकडे पसरताच तेथे दर सोमवारची यात्रा सुरू झाली. या वेळीं महाराजांचे वय सुमारे ११ वर्षांचें होते. तेथून दोनतीन वर्षें जवळ जवळ हजार दीडहजार मनुष्य यात्रेला जमत असे. सोमवारीं रात्रभर पहांटे चार वाजेपर्यंत दिंडी पालखी व भजनाचा गजर सारखा चालत राहिला. गांवोगावच्या दिंड्या व भजनीं मंडळी येऊं लागली व ब्राह्मणभोजनें व पंक्ति वगैरे महाराजानिमित्त सुरू झाल्या. एके दिवशीं असे झाले कीं, श्रीमुक्तेश्वराच्या देवालयामध्ये गावातील मंडळी व आम्हीं पंचपदीकरितां जाऊन घरीं परत येत असतां, रस्त्यात एका गोसाव्याच्या घराच्या दरवाज्यामध्यें एक मोठी दगडाची शिळा पडली होती. तिजवर माझा पाय पडताच मला चक्कर येऊन मी थोडा दूर पडलों व पायांत एकदम दर्द झालें त्याने दोनतीन दिवस मीं अस्वस्थ असल्याची बातमी तालीमलेकर देशपांडे यानीं महाराजास दिली व विनंती केली कीं, आपल्या वडिलांस होणाऱ्या त्रासांतून मुक्त करण्यास आपण समर्थ आहा हें ऐकून महाराजांनीं त्या जागीं जाऊन त्या शिळेवर एक चिमूट भस्म टाकले. त्याबरोबर त्या शिळेचे चार तुकडे झाले व त्यापैकीं थोडें भस्म दर्दाच्या जागीं लावण्यास मला दिलें व

त्यानें माझे दुःख त्वरित मिटलें. सारांश, त्या दगडात काहीं समंधाची बाधा होती, त्या समंधाचा मोक्ष त्या भस्माने झाला, पुढे दर सोमवारच्या यात्रेंत गावोगांवची ज्याना पिशाच बाधा झालेली होती अशीं माणसे येऊन बरीं होऊन जात असत, वयाच्या ११ वर्षापासून महाराजांनीं पाचलेगांवीं राहाण्याचें कमी करून हिंगोली, नादेड, वाशीम वसमत व हैदराबाद या ठिकाणीं ते राहूं लागले. तेणेकरून पांचलेगांवच्या सोमवारच्या यात्रेचे महात्म्य कमी झालें.

हैदराबादचे गुंडराव देशमुख जात ब्राह्मण यांच्या कुटुंबास भयंकर पिशाच-बाधा झाली होती. तेणेकरून त्या बाईस रात्रंदिवस फार पीडा होत असे. सर्व उपचार झाले. अखेरीस बाई जिवास कंटाळली हे महाराजांस समजलें व त्यांनीं त्या बाधेचा बंदोबस्त करून तिला बरी केली, ही त्यांची कीर्ति हैदराबादे-सच काय, पण सर्व निजामशाहींत पसरली. राजा किसनप्रसाद व शिवराज बहादुर यांची महाराजांच्या योग्यतेबद्दल पूर्णपणे खात्री झाली. राजा शिवराज बहादुर हे मोठे धर्मवंत होते. त्यांनीं आपल्या मकाणीं महाराजांस ठेवून घेऊन त्यांच्या आज्ञेप्रमाणे शतचंडी वगैरे व्रतें सिद्धीस नेलीं.ह्याच कारकीर्दीत महाराजांस करोडगिरीचे परवाने व पोलीसची इमदाद व स्वतःस चार सेवासदनाचे जवान मनुष्य ठेवण्याची तजवीज झाली व चार सेवासदनाचे बिल्लेही मिळाले.

यानंतर महाराज पांचलेगांवास आले व तेथें काहीं दिवस राहून नंतर वऱ्हाड प्रांतांत फिरावयास गेले. हिंगोली वाशीम, मेहेकर, इलचपूर, अकोला, नागपूर, ह्या प्रांतांत राहून अन्नदानाचा उत्कर्ष बऱ्याच रीतीनें झाला. नंतर पुन्हां पाचलेगांवास येऊन तेथे वयाच्या १२।१३ वे वर्षी राहिले. त्यांचे चुलत बंधु सखाराम यांचा व्रतबंध होण्याचे ठरलें. वैशाख वद्य ९ मीस मुंज लाभत नव्हती. महाराजांनी सांगितलें कीं, ही मुंज ह्या सालीं न करितां पुढच्या सालीं केल्यास निर्विघ्नपणें शेवटास जाईल. अगर ग्रहाचा जप करून मुंज केल्यास ठीक पडेल पण मंडळींने तिकडे दुर्लक्ष करून त्याच मुहूर्तास मुंज लागली; दुसरे दिवशीं सोमवार होता. यात्रेचा समाज बराच जमला होता. महाराजांनीं सकाळीं १० वाजतां मंडपांत बसून समाधि लावली एक घंटयानंतर समाधि विसर्जन करून मला सांगितलें कीं,१ घंटयाच्या आंत तुम्हीं आपल्या मकानांतील एकंदर

सामान काढून फराकत व्हा, असें न केलेंत तर तुम्हांस भयंकर दुःख प्राप्त होऊन एका मनुष्याची आहुती सुद्धां होईल. असें बजावून त्यांनीं आपलें पूजेचें साहित्य घेऊन ते स्वतः श्रीमुक्तेश्वराच्या देवालयाकडे जावयास निघाले. जातांना वाटेंत गोपाळराव देशमुख रिसोडकर यांनांही सांगितलें कीं, थोडया वेळानें आमच्या मकांनीं कसा थाट होईल तो लवकरच आपल्या दृष्टीस पडेल. असें त्यांस सांगून महाराज श्रीमुक्तेश्वराच्या देवालयामध्यें जाऊन ध्यानस्थ बसले. तो इकडे मुंजीच्या मांडवाच्या ठिकाणीं पाकनिष्पत्तिकरितां ठरविलेल्या मंडपाच्या भागांत खोदणीचें निमित्त होऊन एकाएकीं सर्व मंडप पेटून इमारतीस आग लागून २३ खण खालीं व तेवीस खण माडींत इतका इमला जळून एका तासात भस्मसात् झाला व महाराजांच्या आईची आई ह्याही त्यांत बळी पडल्या, दुसरे दिवशीं महाराजानीं येऊन जळकें मकान अवलोकन केलें व आपल्या आजीचा अंत अशा तऱ्हेनें झाल्याबद्दल आपल्या आईची समजूत महाराजांनीं करून तिचे सांत्वन केलें.

नंतर कांहीं दिवसांनीं श्रीमुक्तेश्वराच्याजवळ महाराजांनीं एक यज्ञ केला. तोही फार थाटाचा होऊन निर्विघ्नपणें सिद्धीस गेला. पुढें देवालयाचें काम सुरू करण्याची तयारी करून गांवांतील मंडळींनीं मदत देऊन व बाहेर गावचे लोकांचीही त्या कामास मदत घेतली. देवळाचें काम म्हणजे पाया वगैरे खणून चार महिन्यांत जमिनीवर दोन फूटपर्यंत झालेलें आहे. खर्च जवळ जवळ ८००० रु. झाला आहे व त्यांत गांवांतील मंडळी माणीकराव देशमुख यांनीं ५१ रु. वर्गणी बक्षीस देऊन ९२५ रु. कर्जाऊ दिले. व सदाशीवराव देशमुख यांनीं १००० रु. कल्दार बक्षीस वर्गणी देऊन शिवाय १२०० रु. कर्जाऊ दिले आहेत. वरील कर्ज बाकी आहे व काम अर्धवट पडलें आहे.

नंतर महाराज हिंगोली व कळमनुरीस जाऊन कळमनुरीस यज्ञास आरंभ केला. पूर्णाहुतीचे दिवशीं जवळ जवळ एक लाख जमाव जमून यज्ञ समारंभ निर्विघ्नपणे शेवटास गेला. त्या समारंभांत ह. भ. प. दासगणू महाराज श्रीमंत कुर्तकोटी शंकराचार्य व गाडगे महाराजही आले होते व ठिकठिकाणचे

पुष्कळ विद्वान् ब्राह्मणही आले होते. त्यांची यथायोग्य संभावनाही झाली. शंकराचार्यांना पांचशे एक रुपये दक्षणा देऊन प्रसादाऐवजीं एक हर्द शालू दिला गेला. त्यांनींहीं महाराजांस व मलाही हर्द शालू दिले. श्रावण महिन्यापासून महाराजांचा मुक्काम हिंगोली येथें श्रीयुत बापुसाहेब डोईफोडे यांचे येथें आहे.

## रा. रा. निळकंठ गडी काठीकर यांच्या श्री साईनाथ कृपालहरी नं. १ मधील कांहीं वेंचे

### प्रार्थना.

#### भुजंगप्रयात

सताची कृपा वर्णवेना सरेना ।
भवाब्धी जलीं ती बुडेना भिजेना ॥
दया-सिंधु, भक्ता, गुरु सांईनाथ ।
कृपा हीन-दीना करी बा सनाथ ॥ १ ॥

स्वभक्ता कृपा मायसी तोषवील ।
सदानंद चित्ता प्रती पोंचवील ॥ २ ॥

सदा हर्षवी बालका माय जेवीं ।
गुरूची कृपा नीलकंठास तेवीं ॥ ३ ॥

#### श्लोक=भुजंग प्रयात

पदां आठवावे सदोदीत ध्यावे ।
भवाब्धी प्रतीरा सुखेनैव जावें ।
कृपेनें तराया जगीं मोह माया ।
नमस्कार सांई गुरूनाथ पायां ॥ १ ॥

जगत्सर्व निर्माण देव कृपेने ।
तिथें मानवा हक्क आला कशानें ।

अहंता महा भ्रांति खोटी सराया ।
नमस्कार साई गुरूनाथ पायां ॥ २ ॥

सदा स्वार्थबुद्धी करी कर्म खोटें ।
सदा दंभ दावी कसा देव भेटे ।
घडे पाप संताप सारा सराया ।
नमस्कार साई गुरूनाथ पायां ॥ ३ ॥

गुरूलाभ लोकीं सदा सात्विकास ।
जर प्राप्ति शुद्धी सुबुद्धी विकास ।
खरी कार्यसिद्धी मना शांति याया ।
नमस्कार सांई गुरूनाथ पाया ॥ ४ ॥

सुवर्णत्व लोहास देतो परीस ।
परी ना कधीं लोह झाला परीस ।
कृपा शक्ति ही सद्‌गुरू साम्य याया ।
नमस्कार सांई गुरूनाथ पायां ॥ ५ ॥

नृपाळा न येते नृपाळत्व देतां ।
असामान्य लोकीं गुरूदेवदाता ।
नसे शक्ति माते गुरूनाथ गाया ।
नमस्कार सांई गुरूनाथ पायां ॥ ६ ॥

गुरू चिंतना जाहला कोण बद्ध ।
गुरूच्या कृपें शिष्य झालेच सिद्ध ।
करी मस्तकीं तूं कृपाहस्त छाया ।
नमस्कार सांई गुरूनाथ पायां ॥ ७ ॥

जगत् चाललें सर्व हें मृत्युपंथें ।
प्रतीरास जाणें गुरूच्याचि हस्तें ।

तिथे कामिं काया न मौक्तिक माया।
नमस्कार साई गुरूनाथ पायां ॥ ८ ॥

गुरू पायीं प्रमास नाहीं तुलाही ।
धरी भावना सन्मना सद्हेतुलाही ।
मना सिद्धि साधी गुरूला जपाया ।
नमस्कार सांई गुरूनाथ पायां ॥ ९ ॥

## भुजंग प्रयात.

अहंता गुणें रावणा मृत्यु आला ।
अहंता गुणे कौरवाधीश गेला ।
शिशूपाळ निंदी नमे कृष्णनाथा ।
धरूं सांई प्रेमा गळाया अहंता ॥ १ ॥

अहंता नसे क्षम्य सर्वेश्वरास ।
अहंता महा उग्र ही पापरास ॥
अहंता अकीर्तीस नेते दिगंता ।
धरूं सांइ प्रेमा गळाया अहंता ॥ २ ॥

अहंते मुळे नाश सर्वस्व आहे ।
कृपा दृष्टिने कोणी ना त्यास पाहे !
अशा दुष्ट वृत्तीस तूं सांई हंता ।
धरूं सांई प्रेमा गळाया अहंता ॥ ३ ॥

अहंते सदा तुच्छ मानी स्वदेशी ।
सदा वंदि प्रेमें अपात्रा विदेशी ।
नमेना कधीं पूर्वजा साधु संता ।
धरूं सांइ प्रेमा गळाया अहंता ॥ ४ ॥

जगा वावुगे बुद्धि कौशल्य दावी ।
मृषा वाणी दंभे जगासी वदावी ।
भजेना कधींही कृपाळू अनंता ।
धरूं साई प्रेमा गळाया अहंता ॥ ५ ॥

म्हणे मीच ज्ञानी महा बुद्धिवंत ।
महा श्रेष्ठ लोकांत भूदेव संत ।
जगा दाखवीतो सदूपाय पंथा ।
धरूं साई प्रेमा गळाया अहंता ॥ ६ ॥

भुले नित्य मायातमीं पाप-कर्मी ।
जगा दाखवी नित्यही गर्वउर्मी ।
क्षणार्धांत भंगेल माया न चिंता ।
धरूं साइ प्रेमा गळाया अहंता ॥ ७ ॥

अहंता गुणें श्रेष्ठता भग्न झाली ।
अहंता गुणें धर्म बुद्धी निमाली ।
अहंता गुणें विस्मरे श्रीअनंता ।
धरूं साइ प्रेमा गळाया अहंता ॥ ८ ॥

## दिंड्या.

नमूं सांई सद्गुरुनाथ पायां ।
करूं वाणी मन बुद्धि शुद्ध काया ।
साइनाथाची पुर्ण कृपा छाया ।
वायु रूपें वारिते मेघ माया ॥ १ ॥

सांइ चरणामृतलाभ जया होय ।
तिथे गोदावरि पुण्य प्राप्त तोय ।
स्नानभक्ती दाविते सर्व सोय ।
करीं येइल स्वानंद तरूकोय ॥ २ ॥

पाप तापाची तिथें होय रक्षा ।
जिथें प्रेमे लक्षिता सर्व साक्षा ।
सांइ ध्यानीं येतांच कार्य सिद्धी ।
हानि पापा, ये सुकृतास वृद्धी ॥ ३ ॥

आज आली ही गुरू पूर्ण--मासी ।
सांइ चिंतन हर एक घडो स्वासीं ।
आज आनंदित सर्व शिर्डिवासी ।
नाशिकाच्या सन्निध नवी कासी ॥ ४ ॥

गुरू कन्या रासीस आतां आला ।
गुरू कन्या शिर्डीस मोद झाला ।
नदी झुळ झुळ लेंडि ही गमे कृष्णा ।
सांइ दर्शन भागवी भक्त तृष्णा ॥ ५ ॥

गुरू पूर्णीमे संत घरा येती ।
भजन- प्रेमें भक्तांस मोद देती ।
गुरू भक्तीची वाहणार गंगा ।
येती स्नाना साधती संत संगा ॥ ६ ॥

## साक्या.

साइनाथ चरित्रास । गाऊ परम पवित्रास ॥
अमंगळाचे मंगल करणें आहे गुरूच्या हातीं ॥
अभद्र वाणी भद्र कराया समर्थ गुरुवर मूर्ती ॥ १ ॥

दुश्शकुनाला नष्ट करी नित ऐसी सद्गुरु सत्ता ॥
भक्त रक्षणीं गुरुवर दाविल कलिकालाला लत्ता ॥ २ ॥

सद्गुरु चिंतन शिर्डीस आणि गंगापार करोनी ॥
सद्भावानें दर्शन घडले हृदयीं प्रेम भरोनी ॥ ३ ॥

प्रेम रसाचें सुगंध पाणी गुरुनाथाला न्हाणी ॥
दासगणुची प्रेम रसिकता आणुनि नित्यहि ध्यानीं ॥ ४ ॥
दासगणूचे कविते उपमा साजे रवि तेजाची ॥
नव काव्याला उपमा स्वल्पच ज्योति काजव्याची ॥ ५ ॥
स्नेहें भिजविन मन-ज्योतीला ओवाळिन मी पायां ॥
दयाघनाची आम्हा वरती पडो कृपा नव छाया ॥ ६ ॥
साईनाथ चरित्रास । गाऊं परम पवित्रास ॥

## ॐ श्रीगुरुसाईशप्रसन्न

" प्रभुगुरु श्रीसाईश मालिकांची सगुण मूर्ति असतांना त्यांच्या **लीला व आता** सगुण मूर्ति दसऱ्यास देहीं समाधी झाली असता, त्या वेळेची **आठवण व** त्यानंतरच्या लीला व त्यांवर सुचलेले विचार याचे दृश्यचित्र.

गजल ( चाल—आनंद कंद ऐसा. )

**भक्तासि सांइ वाली । जगतीं भरोनि उरली ॥ धृ. ॥**
**मधु बोल तो तयांचा । ऐकोनि मुग्ध वाचा ॥**
**होवोनी मूर्ति गेली । जगतीं भरोन उरली ॥ १ ॥**
**जग सर्व पाहियेले । रंगांत दंग झाले ॥**
**देहाचि विस्मृती हो । जगतीं भरोनी उरली ॥ २ ॥**
**जगतांत नाद भरला । चैतन्यरूप झाली ॥**
**जागे करी जगाला । ती मूर्त सांच गेली ॥ ३ ॥**
**जगतांत मोद विहरे । मोदांत जग फिरे रे ॥**
**धांवोनि मांदी आली । जगतीं भरोनि उरली ॥ ४ ॥**
**निःस्तब्ध सर्व झाले । तल्लीन सर्व झाले ॥**
**ज्योतिही निघोन गेली । जगतीं भरोनि उरली ॥ ५ ॥**
**जगतांसि जादु भूल । पाडील सर्वकाळ ॥**
**सांई न जादु वसली । जगतीं भरूनी उरली ॥ ६ ॥**

जादू जगांमधील । जादूंत गुंतवील ॥
परि हीनकृति माजो ? । जगतीं भरोन उरली ॥ ७ ॥
जादू तियें मधील । मोक्षास दाखवील ॥
कृतिही सुटोनि गेली । जगतीं भरोनि उरली ॥ ८ ॥
बाबा ? तुझ्याविणे रे । समजे मला न तीरे ॥
शामाऽस ना कळेरे । लीला तुझीच असली ॥ ९ ॥

भवदीय विनयावनत

श्रीउद्धवेश ऊर्फ श्रीसाईसुत शामदास

## प्रार्थना ॥

गजल ( चाल—आनंद कंद ऐसा, )

साई त्वदीय पायीं । हें बाळ लीन ॥ धृ० ॥
करुणा करोनि पाही । उचलोनि अंकिं घेई ॥
बिंदू कृपा मृताचा । पडुंदे मदीय डोई ॥ १ ॥ सांई ॥
लवकष्टि बाळ होतां । स्मरते तयास आई ॥
पडतांच हांक श्रवणीं । क्षणि ती द्रवूनि येई ॥ २ ॥ सांई ॥
गुरुमाय तूं दयाळे ? । जननीहुनी उदारा ॥
चुकल्या खटा नटाला । स्वयमेव देशि थारा ॥ ३ ॥ सांई ॥
असलों कसा जरी मी । आलों तुझ्या घराला ॥
वारोनि आधि व्याधी । कारेपूत पामराला ॥ ४ ॥ सांई ॥
कवने तुझी कराया । दुबळी मदीय वाणी ॥
नच भाव भक्ति यांचें । मुरलें तियेत पाणीं ॥ ५ ॥ सांई ॥
भवदीय नाम स्पर्शें । पावित्र्य तीस यावें ॥
म्या बोबड्या मुलानें । मधुबोल नित्य गावे ॥ ६ ॥ सांई ॥
तारा सतारिच्या कां ? । गातात गीत कांहीं ॥
वस्ताद वाद्यपटु जो । छेडोत त्यांस जाई ॥ ७ ॥ सांई ॥

भवदीय विनयावनत

श्रीउद्धवेश ऊर्फ श्रीसाईसुत शामदास

## श्रीसाइनाथ प्रसन्न.

### दिंडी.

नमन माझें सद्गुरो; साइराथा ।
देइं शक्ती मम अंगिं गुण गाया ॥
भक्तिविरहित मी असे ज्ञानहीन ।
शरण चरणीं हा येत दास दीन ॥ १ ॥

**पद** चाल—( ये सद्गुरराया किर्तनी )

सांईनाथ स्मरो । घडीपल सांईनाथ स्मरो ॥
सकल भावसे नाम जपीये । निर्मळ हृदय करो ॥ १ ॥ घडीपल ॥
संत और, भगवंत एक है । मनमे ख्याल करो ॥ २ ॥ घडीपळ ॥
नाम पुकारे, सब कुछू साधे । निश्चय ना विसरो ॥ ३ ॥ घडीपल ॥
दास शंकर, यहि नामको । इच्छित पूर्ण करो ॥ ४ ॥ घडीपळ ॥

### अभंग.

धन्य धन्य ज्यांसी शिरडीचा वास ॥ धन्य ते जन्मास प्राणी आले॥१॥
चोहों खाणीं मध्ये होते कोणी एक ॥ त्रिगुण कीटक पक्षीराज ॥ २ ॥
उत्तम चांडाळ नर नारीं बाळे ॥ अवघीं मंगले चतुर्भूज ॥ ३ ॥,
सकळ साई हा भरला अंतर्बाह्य ॥ दुजे नाहीं कोणी वसे तेथे ॥ ४ ॥
शंकर हा म्हणे तेथे मी राहीन ॥ सांडोबा पाषाण हाची दास ॥ ५ ॥

साईचा दासानुदास

शंकर वासुदेव सामंत, ठाणे.

# श्रीशंकर.

श्री सच्चिदानंद सद्गुरु आधुनिक संत चूडामणी श्रीसमर्थ सांई बाबा-महाराज संस्थान शिर्डी, तालुके कोपरगाव, जिल्हा नगर याच्या शके १८५० इ. स. १९२८ च्या श्रीरामजयंतीच्या उत्सवाचा अहवाल:—

चालू साली उत्सवास गर्दी विशेष नव्हती. अजमासे पाच दिवसांत मिळून समर्थांच्या पवित्र चरणाचे दर्शन घेऊन पंचवीसतीस हजार माणूस येऊन गेलें असेल, मागील वर्षाप्रमाणें यदाही श्री. बालब्रह्मचारी नृसिंह बाबामहाराज पांचलेगांवकर हे विनंतीस मान देऊन आले होते. त्यांनी आपल्या अगचें सामर्थ्य श्रीयुत दामोदर रामकृष्ण बापट राहाणार नाशिक, याना सर्प डसवून दाखविले. तसेंच नगराच्या एका कासाराच्या बाईस मशिदीजवळ तेल्याच्या घरीं रात्रीं ९॥ वाजता सर्पदंश झाला, सर्पानें टांच फोडिली. बाई व तिचा नवरा वगैरे मंडळी फार घाबरली होती, त्यांना पाचलेगांवकर महाराजांनी आश्वासन देऊन सर्पाच्या विषाची बाधा मुळीच होऊं दिली नाही. चावलेला सर्प चावल्यानंतर लोकांनी धरला व एक दिवस त्यास मडक्यात घालून ठेविला. सर्प दहाच्या आखाचा विषारी नाग होता. त्यावरून महाराजांच्या ताकदीची सर्वांना खात्री पटली.

या उत्सवास नादेड, बोराळे, कलमनुरी, उमरी, माजरम, रुई, मुखेड, माजलगांव, खदार, पांगरी, पुणें, मुंबई, सांगली, जळगांव, मनमाड, यावल, नगर, नाशिक, इंदूर वगैरे लांब लांबच्या ठिकाणाहून बरीच माणसे आली होती. शिर्डीच्या आसपासची माणसें सुगी असल्यामुळें येऊं सकले नाहीत. यामुळें जत्रा थोडी कमी भरली लांबची माणसें पुष्कळ आली, पण जवळची कोणी आली नाहीत. उत्सवांत तीन दिवस जिलबी, लाडू, शिरा अशी पक्वान्नें करण्यांत आली. पांच दिवसांत मिळून तीन साडेतीन हजार पान झाले. कोठीचा बदोबस्त मुखेडची मडळी श्रीयुत गोविंद व्यकटी महाजन, मारुति पत्तेवार, दिगबर बाबा पत्तेवार वगैरे मंडळींनी उत्तम तऱ्हेने टेविला होता. वाढण्याचा बंदोबस्त गोपाळराव बोराळकर, रामराव दिवाळकर या उभयता सद्गृहस्थानी आपल्या हाताखाली बालचमू घेऊन उत्तम तऱ्हेने केला. उमरीकर मंडळींनी आपल्या नवसाच्या मुलाचे जावळ काढलें. रामनवमीचे दिवशी निशाणाची व रथाची मिरवणूक होऊन रात्रीं हुसेन सक्कर दलाल वगैरे मुसलमान लोकानी सदल काढून महाराचांचे समाधीस चढन चढविले त्यानतर दारूकाम फारच उत्तम झालें कुस्त्यांचा हगामा बक्षिसाची रक्कम कमी पडल्यामुळें जसा व्हावा तसा झाला नाही जर गावच्या लोकांनीं आपसांतील दुही टाकून देऊन वर्गणी केल्यास हंगामाही मोठा चागला भरेल.

जत्रेंत हलवायांची, कासाराची, कापडवाल्याची दुकाने बरीच आली होती. तसेंच सर्कस व लहान खेळ दोनतीन आले होते. जत्रेचा बदोबस्त राहत्याच्या पोलीसांनीं चांगला ठेविला चोरी, दुखापत, मारामारी वगैरे कांही एक झालें नाही. एकादशीचे दिवशी पालखीची मिरवणूक झाली. द्वादशीस गोपालकाला होऊन सर्व मंडळी आनंदानें आपल्या गांवांकडे रवाना झाली. या उत्सवांत ज्या मंडळीनी द्रव्य सहाय्य केलें व जे उत्सवास हजर होते, व ज्यांनी मनापासून अंग मेहेनत केली.-त्या सर्वत्रांचें त्यांच्या मुलाबाळाच्या आरोग्याचे, इज्जतीचे समर्थांनी कृपादृष्टीनें अवलोकन करून रक्षण करावें. त्यांचें आयुष्य व इज्जत वाढवावी. संसारातील कोणतीही आपत्ति या वरील मंडळीवर येऊ देऊ नये.

आम्हीं सर्व मंडळी समर्थांची लेंकरें आहोत, तेव्हां आमचें रक्षण करणें सर्वस्वी महाराजांच्या हाती आहे. तरी महाराजांनी आमच्या हातून जाणून न जाणून विकारवश होऊन ज्या कांही चुका अपराध झाले असतील त्याबद्दल माफी करावी, अशी सर्वत्रांच्या तर्फे माझी समर्थांच्या पवित्र चरणी नम्र विनती आहे व अशीच सालोसाल या दासाच्या हातून उत्सवाची सेवा घेत जावी. सेवेशी श्रुत होय, हे विज्ञापना

**पुंडलीकवरद हरि विठ्ठल । सीताकांत स्मरण जयजयराम ॥**

**पार्वतीपते हरहर महादेव । श्रीसमर्थ रामदास । ज्ञानेश्वर तुकाराम महाराज की जय । श्रीसद्गुरु साईनाथ महाराजकी जय । श्री वामनशास्त्री महाराजकी जय ।**

**सकल संतांचा चरणरज**

**दासगणू.**

# श्रीशंकर

## श्रीसच्चिदानंद सद्गुरु आधुनिक संत चूडामणि श्री साईबाबा महाराज संस्थान शिर्डी, तालुके कोपरगांव. जिल्हा नगर, यांचा शके १८५० विभवनामसंवत्सर इसवी सन १९२८ च्या श्रीरामजयंतीच्या उत्सवाप्रीत्यर्थ झालेल्या जमाखर्चाची तपशिलवार यादी.

**जमा सुर्ती रु.**

५१ रघुनाथ नरहर बचूवार, पुणे.
२१ धोंडोपंत वकील, नांदेड.
२५ नारायण जनार्दन तेंडुरकर, मुंबई.
२५ श्रीमंत सरदार नारायणराव गोविंदराव बुळे, इंदूर.
२५ भवानराव बनसोडे, इंदूर.
२५ अण्णासाहेब बोराळकर.
२ बळवंत अपाजी वैद्य.
२ दत्तात्रय मार्तंड नाईक, पुणतांबे.
१। पंढरीनाथ वामन नाचणें.
५। बाळा मोत्या कोळी.
५। परशराम अपाजी नाचणें.
५ लक्ष्मीबाई गोरक्षकर.
१। वसंतराव गोरक्षकर.
१। ताराबाई नारायण गोरक्षकर.
१। नवुबाई शिवराम धुरंधर.
१। सुदामादेवी धुरंधर.
१। शामराव गणपतराव धुरंधर.
१। बाबराव जयकर.
१। शामराव दिनानाथ
५। डॉ. धोंडोपंत अजिंक्य.
५ विनायक अपाजी, अंधेरी.
१ बळवंतराव जयकर, वांद्रे.
४ गिरजाबाई पाटलीण, रांस.
५ विनायक बळवंत प्रधान, कोंकण.

**खर्च रु.**

२५४ रामचंद्र अनंदराम मारवाडी रा. शिर्डी यांस कणिक, रवा, तेल, हरबऱ्याची व तुरीची डाळ, तूप, नारळ, जिरें, हळद, वगैरे सर्व किराणी सामान आणलें त्याबद्दल.
७४। तांदळाची पोती तीन, बदाम बेदाणा, कॉफी, हिंग, केशर, पुण्याहून आणले, हस्ते गोविंद आचारी.
११९ शेखमहंमद अबदुलभाई दारुवाला यांस
१०० शोभेच्या दारुबद्दल
१० गाडीभाडें.
५ पोटगी.
४ उपरणें पान १
११९
६० गोविंद काशिनाथ कर्नळेकर, इसम तीन पुण्याहून आले जाण्यायेण्याचें भाडें व मजुरी स्वयंपाकाबद्दल मिळून
४० राजया तैलंगी आचारी, इसम दोन जाण्यायेण्याचें भाडें व मजुरीसह.
९। भाजीपाला आणला त्याबद्दल.
१६। चहाचें दूध घेसलें त्याबद्दल.
१० सरणाबद्दल विठोबा सुतार यांस दिले.

जमा सुरुवीं रु.

१ राघोपंत जोशी.
०॥० रामभाऊ वैसास, मनमाड.
५ पार्वतीबाई कोठारी.
५ पिरुबाई कोठारी. मुंबइ
१ पिरुजीबाई विजयकर.
१ सुनंदाबाई किर्तीकर.
.५ केशव गोपाळ तळवलकर उमरावती.
११ बापूभैया कोठारी, इंदूर.
५ आत्माराम नथुबा, अंधेरी.
५ डॉ. वासुदेव रघुनाथ तळवलकर, इंदूर.
१०। हरिश्चंद्र रामचंद्र मिस्त्री, अंधेरी.
१। महादेव मधुसूदन जोशी, विरार.
५ रामचंद्र सिताराम देव अंधेरी.
२ बळवंत त्रिंबक दवणें.
५ नारायण नरसिंह फडणवीस काव्यरत्नावलीकार, जळगांव.
१ माधव विष्णू मग्रे, जळगांव.
५ बाबासाहेब देशपांडे, जळगांव.
२ रामचंद्रराव कामत, मुंबई.
११। लक्ष्मण गणेश वैद्य सांताक्रूझ.
१० दामोदर रामकृष्ण बापट, नाशिक.
२५ बाबासाहेब सखंडकर, मुंबई.
२ गंगाबाई गोगटे, पुणें.
५ रमाबाई जोग.
१ गंगुताई फडके, पुणें.
२ येसोदाबाई फडके, पुणें.
११ लक्ष्मीबाई ओगलेकर, पुणें.

खर्च रु.

१९ हुसेनवःद सैदुभाई बाजेवाला राहाणार राहते यांस
१८ बाजाबद्दल
१ ताशाबद्दल
१९
१६ बाबा धर्माधिकारी रामायण वाचण्याबद्दल दिले.
१० रोख
६ उपरणें पान १
१६
१० ब्राह्मणास रामनवमीचे दिवशीं दक्षणा दिली.
६॥।० भोजनदक्षणा पांच दिवसांची
५ श्री सांई बाबामहाराजांची पांच दिवसांची दक्षणा.
१२ श्रीपाचलेगांवकर महाराजांस आणण्याचा खर्च हस्ते विठ्ठलराव.
२५ श्रीपाचलेगांवकर महाराजांस पोंचविण्याचा खर्च हस्ते रामराव वरुडकर.
२० नवलकर वकिलांनीं दासगणु महाराजांवर संस्थानच्या ज्या जागेंत उत्सवाचा स्वयंपाक केला, ती जागा आपली आहे म्हणून कोपरगांव कोर्टांत फिर्याद केली त्यासंबंधीं नकला वगैरे घेण्याकरितां खर्च.
६। बायाची व गड्यांची मजुरी हस्ते बाळा गुरव
४ भांडीं आणण्याकरितां व नेण्याकरितां गाडीभाडें हस्ते माळसा. गटु शिंदे
२ प्रसादाबद्दल नारळ आणले.
७। किरकोळ खर्च.

**जमा सुर्ती रु.**

१३६॥।~गोविंद रघुनाथ दाभोळकर, यांचे. करून त्यांचेकडील खर्च वजा होता इकडे आले ते.

१० दाजी विठ्ठल सावारे
२ गोविंद रघुनाथ दाभोळकर
१० वी. एस् ओक
१ बाबाजी आनंदराव
१ यशवंत गोविंद
१ बाबा सामंत
२ यशवंतराव
१ गंगाधर चौगुले
१० डॉ. रंगनाथ गव्हाणकर
२ सत्यवान रामचंद्र
२ चिंतामण रंगनाथ
२ सुलोचनाबाई वाकडे
२ शांताबाई
२ आनंदराव राजाराम
१० डॉ. के. व्ही. सावे
१॥ व्ही. वैद्य
३॥। माधव गंगाधर
५ त्रिंबक आनंदराव कर्णिक
२ द्वारकानाथ
१ शंकर प्रधान
१ जी. एन्. फणसे
१ कृष्णराव वैद्य
२।~ गोविंद रामचंद्र
२ चंपूबाई
५ गोविंद नारायण दाभोळकर
५ यमुनाबाई सामंत
२ गोविंद नारायण
५ जनार्दन यशवंत दाभोळकर
१ सिताबाई सामंत

**खर्च रु.**

१३।~एकादशीच्या दिवशीचें फराळाचें सामान. भगर, दाणे, साबूदाणा, खजूर. हस्ते गोविंद महाजन,

१३८=।श्रीसांई बाबांमहाराजांकडील पांच दिवसांचा खर्च हस्ते बाळा गुरव.

३।=॥ श्रीसांई बाबांकडील किरकोळ खर्च

१६ फराळाचे लाडू, चिवडा, चहाचे वगैरे
२। चोपा मांडव घालणेंबद्दल हस्ते वामन पाटील.

६ लक्ष्मण बापाजी जोशी.
  ५ उपरणें पान १
  १ दक्षणा
  ---
  ६

६ बाळा काशिराम शिंपी चोपदार यांस उपरणें पान १
५ मार्तंड भगत यांस उपरणें पान १ व रोख रु. १
५ गट्या चोपदार उपरणें पान १
१२ पालखीवाले उपरणें पान ४
३ रंगनाथ गुरव यांस उपरणें पान ४ प्रत्येकास एकेक दिले.
  १ बयाजी जगताप
  २ रामा न्हावी
  ३ यादव शिंदे
  ४ विश्वनाथ न्हावी
४ अण्णा मशिद रखवालदार उपरणें १
४ अबदागिरवाला उपरणें पान १
३ ताशेवाला माणिक उपरणें पान १
७ बाळा गुरव यास उपरणें पान १
५ अनाजी कुंभार ४ रु. उपरणें पान १ रोख १ रु.

**जमा सुर्ती रु.**

१ सिताराम वालावलकर
२ सीताराम गोपाळ
१ महादेव नामदेव
५ जनाबाई घटे
५ सावळाराम आत्माराम
१। वासुदेव सावळाराम
१। सौ. राधाबाई
१। कृष्णाबाई
१। बाळकृष्ण राघो सावंत
१ माणिकबाई
१ ताराबाई
५ श्रीकृष्ण पुरुषोत्तम पाटील
२ विष्णु बळवंत पितळे
२ गजानन श्रीधर
२ प्रयागबाई
७ नारायण बाळकृष्ण
४ यशवंत राजाराम
५ शामराव भास्कर

**जमा कोरे ( हल्ली रुपये )**

७ बहाखाते आले ते-
५ किसन उदगिरकर
११ सखाराम रुईकर
६ गंगा बीसनलाल मारवाडी
२ दासगणूमहाराजांपुढें आले.
१४ धोंडीराम ताराचंद मारवाडी
५ रोख
९ सोन्याचे वेरे ६ मा. दर १८ प्रमाणें.
——
१४
२१ बाबा रामचंद्र पत्तेवार
२१ गोविंद व्यंकटी महाजन मुखेड

**खर्च रु.**

५ मथ्या न्हावी दिवाबत्तीबद्दल ४ उपरणें पान १ रोख १ रु.
१॥ कारभाऱ्या माळी हनुमानजयंतीच्या स्वयपाकाबद्दल.
१॥। नारायण सदाशिव गोदकर धोतरजोडा १.
२॥ गणपतराव धुरंधर यांस धोतर जोडा.
२॥। अबदुल यांस साडेतेरा हात कापड दिलें.
४॥= गरीब लोकांस सदरे केले ते. १ तावडे. २ आनंदा. ३ माधव. ४ सिंगाड्या. ५ बाबू. ६ अबादास. ७ लंगडीचा मुलगा. हस्तें जव्हारमल मारवाडी.
२८।≤। कचरू मारवाडी याजकडून हनुमानजयंतीचे सामानाबद्दल दिले.
१४ गाडीभाड्याबद्दल चितळी, कोपरगाव, पुणतांबे वगैरे ठिकाणी गेल्या त्याबद्दल. हस्तें बीरदीचंद, गण्या, नामा, रघुसिंदे माळसा कोल्या,
१० रामचंद्र अनंदराम उर्फ कचरू मारवाडी यांस दिले.
१६ गुळ ढेपा ४ गुळशिरा पौर्णिमेच्या दिवशी केला त्याबद्दल.
८४ तूप डबे तीन जिलभी, लाडू, शिरा, केला त्याबद्दल.
१३ पत्रावळी तिखट आलें तें खर्च.
१ पिवळा तापता श्रीपाचलेगांवकर महाराजांस लंगोटी दिली त्याबद्दल.
५ अनाथ विद्यार्थी यांस मदत. हस्ते दाणी वामन चिदंबर मास्तर.

**जमा सुर्ती रु.**

७ मारुति पत्तेवार मुखेड
११ रंगनाथ चनैया मुकावार
१ शंकर संग्राम आतनुरकर
२ गंगाधर पाळकर
११ गोविंद कौटीकवार
५ शंकर संभाजी मुखेडकर
५ मल्लपा धनगर
७ चनैया तांबोळी मुखेड
२ रामचंद्रवाणी मुखेड
१ तुकाराम मराठा मुखेड
१९ दासगणू महाराजांपुढें आले ते
५ बट्टाखाते आले ते
३ राजेश्वरराव गांजापूरकर
५ नागोराव उंचेगावकर
५ रामराव दिवाळकर, कलमनुरी
२५ रंगनाथराव ऊर्फ दादासाहेब वरुडकर वकील, कलमनुरी.
४ बट्टाखाते आले ते.
२८ नागोबा वंजारी उमरीयानी तुपाचा डबा दिला.
२८ व्यंकोबा रंगारी १ डबा तूप दिलें.
२८ बाबा रंगारी १ डबा तूप दिले.
९ नारायण वंजारी उमरीकर, पत्रावळी तिखट वगैरे दिलें.
८ चंद्रभागाबाई मांजरमक तिखट दिलें
८ गोविंद व्यंकटी महाजन, उपरणें पान १
९ गोविंद कौटीकवार, उपरणें पान १
१ सदर इसमानें रेशमी तापता दिला.
४ बाबा रामचंद्र पत्तेवार, उपरणें पान १

**खर्च रु.**

१ भांडी घासण्याबद्दल पुंजा कोळी यास दिले.
४४८~ बट्टाखाते नांवें हल्लीं रुपये २८२ दर ८०॥ प्रमाणें खर्च.
५ उत्सवपत्रिका छापिल्या हस्ते गणेश अनंत सराफ, नांदेड.
५ टांगाभाडें कोपरगांव ते शिर्डीपर्यंत दिले.

१०८९॥≈
९३ हंगाम्याकरितां दिले हस्ते तात्या पाटील कोते.

११८२॥≈

अकराशें ब्याऐंशी रुपये चौदा आणे एकंदर.

एक गलेफ वांद्याहून आला तो हस्ते वैद्य यांच्या मार्फत आला. तो खर्च किंमत माहीत नसल्यामुळें दाखल केली नाही.

दासगणू

सुर्ती रु.

६ हस्ते तात्या पाटील कोते
मनीआर्डरी बद्दल

जमा कोरे (हुंडी रु.)

५ नागोबा वंजारी उपरणें पान १
३ नारायण वंजारी, उपरणें पान १
९ अण्णा साहेब बोराळकर, उपरणें जोडी. १
३ त्र्यंबोबा रंगारी, उपरणें पान १
३ राजेश्वरराव गोंआपूरकर, उपरणें
५ लक्ष्मणराव लिंबोजी रेडी
५ साईप्रसाद लक्ष्मणराव रेडी
३ गोपाळराव धोंडू देशपांडे
१० बापूराव राघोजी बोरावके, बेलापूर.
१ डॉ. दिवेकर पोंबरी
४ गुळाचीढेप आली,बापूराव बोरावके.
४ गुळाची ढेप, बाळा पुणेकर
४ गुळाची ढेप, बापुराव नाना
४ गुळाची ढेप गांधी.
११ हस्ते माधवराव देशपांडे
१ नामा गोंदकर शिर्डी
१ यमाजी जगताप मास्तर. इंदूर.
२ रघुजी पाटील शिंदे
९ दासगणू महाराजांपुढें आले ते किरकोळ.
४ महाखाते आले ते.

कोरे (हुंडी रु.)

२५ राजासाहेब माळोडकर
९ वंकटलाल मारवाडी
२९ दासगणू महाराजांपुढें आलेले.
२ नारायणराव पेशकार माजलगांव
१० वासुदेव पांडे, माजलगांव

चुटीं रु.

१ त्रिंबक पतेवार
१५ मुगणेकर गुलचमनबाई हरिद्वार
१ सदाशिव विश्वनाथ देव
५ लक्ष्मणराव लिंगोजी रेडी
२ शांताबाई मझांडकर
५ सुलोचनाबाई वाकडे
१ नारायण गणेश वागळे
१० श्रीपाद रामचंद्र शिरसीकर
५ नारायण बाळकृष्ण पोरे
१। गजानन रामचंद्र प्रधान
५ दिनकर मोरेश्वर पाटकर
१० सीताराम नीळकंठ चौघले
४ गोवींद काशिनाथ गाडगीळ

६४।०

१०६३॥०

२६।० कमी पडलेले दासगण् महाराजांनी दिलें.

१०८९॥।० एकंदर बेरीज दहाशें एकूणनव्वद रुपये चवदा आणे

९३ पेटीत रुपये त्र्याण्णव निघाले.

११८२॥।०

# श्रीसद्गुरु साईनाथ प्रसन्न.

श्री शिर्डी येथील श्रीसाई संस्थानची निरंतरची व्यवस्था करण्यासाठीं अहमदनगर डिस्ट्रीक्ट कोर्टानें एकस्की म ( योजना ) मंजूर करून ती अमलांत आणण्यासाठीं "शिर्डी संस्थान कमिटी" या नावाची कमिटी नेमली आहे, त्या कमिटीच्या आरंभापासून ६ वर्षांची मुदत पुरी होऊन नियमाप्रमाणें चैत्र शके १८५० पासूनच्या ३ वर्षांकरितां नेमलेली कमिटी म्हणजे कार्यकारी मंडळ.

अध्यक्ष

ह. भ. प. रा. रा. गणेश दत्तात्रय सहस्रबुद्धे ऊर्फ दासगणू महाराज.

सभासद

संस्थानचे तहहयात ट्रस्टी

रा. ब. मोरेश्वर वि. प्रधान, बि. ए., एल्‌एल्‌ बी. जे. पी.

श्रीयुत ल. ग. महाजनी

श्रीयुत रामचंद्र आत्माराम तर्खड

प्रोफेसर गणपत रावजी नरके. एम. ए. एम्. एस्. सी.

श्रीयुत तात्या गणपत कोते पाटील.

इतर सभासद

श्रीमंत केशवराव गोपाळ बुटी

रा. ब सखाराम बळवंत धुमाळ

श्रीयुत बाळकृष्ण वि. देव. बी. ए. मॅजिस्ट्रेट

श्रीयुत यशवंत जनार्दन गाळवणकर. बी. ए.

श्रीयुत माधवराव बळवंत देशपांडे

चिटणीस

श्रीयुत गोविंद काशिनाथ गाडगीळ बी. ए., बॅरिस्टर

दुय्यम चिटणीस

श्रीयुत वसंतराव नारायण गोरक्षकर

खजिनदार

श्रीयुत गोविंद रघुनाथ दाभोळकर, रिटायर्ड मॅजिस्ट्रेट

दुय्यम खजिनदार

श्रीयुत रघुवीर भास्कर पुरंदरे

## श्रीदत्त चित्साईगुरुभ्योनमः

सप्रेम सा. न वि. वि. खालीं दिलेल्या मजकुरास, अनुभवास, यात्रा-वर्णनास व प्रार्थनेस आपल्या त्रिभुवनमान्य श्रीसाईलीलेच्या एखादे अंकीं स्थान मिळेल अशी सविनय विनंती आहे.

### अनुष्टुप् वृत्तम्

**सदा सेव्यः सदा सेव्यः सेव्यः श्रीसाइसद्गुरुः ।**
**सद्भक्त्या सर्वभक्तैश्च, सत्वसंशुद्धि सिद्धये ।**

अर्थः—चित्तशुद्धीच्या सिद्धीकरितां उत्कट भक्तिभावाने सर्व भक्तजनांनीं अखंड सेवा करण्यास योग्य अशा श्रीसाई सद्गुरूंची नित्य व निरंतर सेवा करावी

---

## शिरडी गांवाची व्युत्पत्ति.

श्रीसाईलीलेच्या तृतीय वर्षाच्या नवमांकीं बाबांच्या चरित्ररत्नाकराचीं साधने म्हणून जें एक ७७ बाबींचे संक्षिप्त टिपण दिले आहे ।।पैकीं मागील तीन अंकांत बाबांनी श्री गोदावरी तटाकींच वास का केला या प्रथम बाबीचे, बाबा हिंदु कां मुसलमान या २८ व्या बाबीचें व त्याचप्रमाणे बाबा व बाबांची उदी या २३ व्या बाबीचें यथामती विवेचन केलें. आतां या अंकी द्वितीय बाबीचें म्हणजे शिरडी हाच गांव बाबांनी आपलें निवासस्थळ म्हणून कां पसंत केला या गोष्टीचे विवेचन करण्याचे योजिलें आहे.

परमेश्वरनिर्मित सृष्टींत प्रत्येक सजीव निर्जीव, लहानथोर वस्तुस नांव हें असतेंच. व ते सकारण असतें. मग तें कारण वेदांतांत मिळो, पुराणांत मिळो, इतिहासांत मिळो, महात्म्यांत मिळो, कथेत मिळो किंवा आख्यायिकेंत मिळो. ज्या नांवाच्या कारणास आधार वर लिहिलेल्या स्थळीं मिळत नाहीं व जें नांव पूर्वी एखादे काळीं प्रसिद्ध असण्याचा संभव असून कालांतरानें त्याचें महत्व

कमी होत होत त्याचें मूळचें रूप इतकें विकृत होते कीं, हे गांव पूर्वी केव्हां तर वैभवशिखरास जाऊन पोंचलें होतें कीं नाहीं याचा मागमूसही लागत नाही. अशा विकृत व दिसण्यांत क्षुल्लक दिसणाऱ्या नांवाच्या कारणाचा शोध त्याच्या अपभ्रष्ट रूपाच्या व्युत्पत्तीवरूनच लावावा लागतो. प्रकृतस्थळीं आपल्यास तीर्थक्षेत्रांच्या नावाव्यतिरिक्त इतर वस्तूंच्या नांवांशीं कांहीं कर्तव्य नाहीं.

**अलाहाबाद** या शहराचे मूळचें नांव **प्रयाग** ही गोष्ट जगविख्यात आहे. प्रयाग म्हणजे ज्या तीन पुण्य व प्रसिद्ध सरित्तटाकावर पुरातनकाळीं पुरातन ऋषि व राजे यांनीं हजारों मोठमोठाले यज्ञ केले त्या सरित्तीरांनीं मर्यादित केलेली यज्ञभूमि. प्रयाग या नांवाचा उल्लेख वेदांत, मार्कंडेय पुराणात व प्रयाग महात्म्यात आढळतो.

**बनारस** ह्या शहराचें मूळचें नांव वाराणसी. हेही नांव जगप्रसिद्ध आहे! वाराणसी म्हणजे वरुणा व अशी या दोन पुण्य सरित्तीरामधील प्रदेश. यास आधार काशीखंडांत सांपडतो.

**सिद्पूर** उर्फ मातृगया या शहराचे मूळचे नाव सिद्धपूर गया. हें स्थळ जसें पितृगया म्हणून प्रसिद्ध आहे, त्याच प्रमाणें सिदपूर हे ठिकाण मातृगया म्हणून प्रसिद्ध आहे. महर्षि श्री कर्दमऋषि व जगन्माता श्री देवहूती यांच्या संयोगापासून ( सिद्धानां कपिलो मुनिः भ. गी. अध्याय १०, श्लोक २६ म्हणून ) जे सिद्धावतंस कपिल महामुनी ज्या ठिकाणीं जन्मास आले ते ठिकाण यासही आधार सिद्धपूर महात्म्यांत आहे.

ही मोठ्या व प्रसिद्ध शहराची किंवा तीर्थक्षेत्रांची गोष्ट झाली. शास्त्री पंडित व विद्वान लोकाचे लक्ष्यमुख्यत्वेंकरून वरील सारख्या प्रसिद्ध स्थलांच्या नांवाच्या कारणाकडे वेधले जाते. परंतु शिरडीसारख्या चिमुकल्या गावाच्या नांवाच्या कारणाकडे त्यांचे लक्ष कधींही वेधले जात नाहीं. तथापि पुष्कळ वेळां या चिमुकल्या दिसणाऱ्या गावांचीं नांवे सुद्धां अन्वर्थक, बोधप्रद व त्या स्थळासंबंधाने परमपूज्यभाव उत्पन्न करणारीं अशीं आहेत.

ठाणे जिल्ह्यांत मोखाडे पेटयांत एक यःकश्चित् वाशाळे नांवाचें लहानसें खेडें आहे. त्यांत सर्व वस्ती कोळी लोकांची. त्या गांवानजीक एक लहानशी टेकडी आहे. व त्या टेकडीचे पायथ्याशी एका दगडांत कोरलेले एक लहानसें म्हणजे २०--२५ माणसे रहाण्याच्या सोईचें असें एक सुंदर लेणें आहे. लेण्यावर गच्ची आहे. गच्चीचे खांब कोरींव आहेत. जवळच एक त्याच दगडात हौद आहे, व पुढें पटांगण आहे. असल्या ह्या भिकार गांवीं हे लेणे आले कसें याचा तपास करतां व त्याच्या नांवाच्या व्युत्पत्तीवरून असें समजलें कीं, पुरातन कालीं नाशिक, त्रिंबक वगैरे गांवांतून बडोदे वगैरे ठिकाणीं जाणारेयेणारे लोकांच्या सोईसासाठीं हें निवासस्थान म्हणून बांधले असावें. वाशाळे म्हणजे वासालय. यांत " य " चा लोप होऊन " वासाल " असा शब्द राहातो. नंतर " ल " चा " ळ " व " सा " चा " शा " होतो व वासाल--वाशाळ असे अपभ्रष्ट रूप होऊन त्याचे नपुंसकलिंगीरूप वाशाळे असे झाले. असाच प्रकार शिरडी गावाच्या नांवाचा असला पाहिजे

ही गोष्ट खरी कीं, बाबांनीं आपले दिव्य चरण शिरडी गांवांत ठेवल्यापासूनच शिरडीची किंमत, महत्व व ऐश्वर्य वाढले. शिरडी गांवची, पंढरपूर आळंदी, देहू, पैठण, नाशिक, त्रिंबक वगैरे महाक्षेत्रांत गणना झाली. आषाढी कार्तिकी एकादशीस दरसाल ज्याप्रमाणे लोक आळंदीची व पंढरीची वारी करतात त्याप्रमाणे बाबानीं रामनवमीचा उत्सव शिरडींत सुरू केल्यापासून त्या उत्सवप्रसंगीं दरसाल कांहीं भक्तजन शिरडीचीही वारी करूं लागले. शिरडी क्षेत्राचा डंका त्रिभुवनांत गाजूं लागला. शिरडीस पुराण, कथा, कीर्तन, पुण्यतिथि, गुरुपौर्णिमा, गोकुळ अष्टमी, रामनवमीचे उत्सव होऊं लागले. चावडी होऊं लागली. भजने होऊं लागलीं. श्रीसद्गुरु नरसिंह बाबा महाराज पांचलेगांवकर यांच्या सारख्या बालसंतविभूति, शास्त्री, पंडित गायक लोकोत्तर विद्वन्मणि यांच्या मूर्ति या पुण्यक्षेत्राच्या दर्शनास येऊं लागल्या. पुराण व सरित्श्रेष्ठ अशा पुण्यतम श्रीगोदावरी माईनेंही आपलें अद्वितीय व दिव्य वैभव एका बाजूस ठेवून तीही